# सायबर फ्रॉडमधील रक्कम एक दिवसात व्यापाऱ्यास परत

### कराड शहर पोलिसांची कामगिरी

वार्ताहर
कराड

सायबर फ्रॉडची शिकार झालेल्या शहरातील व्यापाऱ्यास त्याचे गेलेले पैसे एका दिवसात परत मिळवून देण्यात कराड शहर पोलिसांना यश आले आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून शहर पोलीस व गुन्हे प्रकटीकरण शाखेने तत्काळ केलेल्या कार्यवाहीबाबत समाधान व्यक्त होत आहे.

शुक्रवारी २८ रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास कराड येथील व्यापाऱ्याचा सायबर फ्रॉड होऊन त्यांच्या खात्यातील ८८ हजार रुपयांची रक्कम चोरी झाल्याचे समोर आले होते. संबंधित व्यापाऱ्याने याबाबत तत्काळ शहर पोलीस ठाण्यास संपर्क केला. त्यांनी घर घेण्यासाठी कर्ज घेतलेले पैसे खात्यावर होते. त्यातील ८८ हजार रुपये ऑनलाईन कट झाल्याचे समोर आले.

सहाय्यक पोलीस निरीक्षक अमित बाबर व पोलीस नाईक संजय जाधव यांनी व्यापाऱ्याकडून घडलेल्या प्रकाराची माहिती घेतली. नमुद माहितीच्या आधारे सायबर पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक अमित झेंडे व अजय जाधव यांना संपर्क करून कारवाई करण्याच्या सूचना केल्या. त्याप्रमाणे सायबर पोलीस ठाणे सातारा व कराड शहर पोलीस ठाण्याकडील सतर्क पोलिसिंगमुळे सायबर फ्रॉड होऊन व्यापाऱ्याचे गेलेले ८८ हजार परत मिळाले. पोलिसांनी केलेल्या कारवाई बाबत व्यापाऱ्याने पोलिसांचे आभार मानले. सायबर क्राईम बाबत नागरिकांनी जागरुक राहण्याबाबत पोलिसांनी आवाहन केले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक समीर शेख, अप्पर पोलीस अधीक्षक अजित बोऱ्हाडे, डीवायएसपी डॉ. रणजीत पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अमित बाबर, पोलीस हवालदार संजय जाधव, सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार अमित झेंडे व अजय जाधव यांनी केली.

तरुण भारत Mon, 31 October 2022
https://epaper.tarunbharat.com/c/70725038